**नि. दि. दा. क्र. १५५/२०२१**
(विश्वनाथ वि. मंडाबाई व इतर)

## निशाणी २४ खाली आदेश

(पारित दिनांक ०३.०३.२०२३)

१. प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याबाबत विनंती केली आहे.

२. वादींनी प्रस्तूत अर्जास नि.क्र. २८ वर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे.

३. प्रतिवादी क्र. ०३ यांच्या कथनानुसार सदर प्रतिवादींना कोरोना महामारीमुळे आवश्यक ती कागदपत्रे व माहीती मिळविणे अशक्य झाले होते व त्या नंतर प्रतिवादीच्या आईचे ऑपरेशन झाल्याने प्रतिवादी क्र. ०३ यां वेळेत मुदतीत कैफियत व म्हणणे देता आले नसल्याचे सांगितले आहे. तरी कैफियत दाखल करण्यास झालेला ०१ वर्ष २० दिवसांचा विलंब माफ करण्यात येवून कैफियत स्विकारण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादीच्या कथनानुसार प्रस्तूत अर्ज खोटा व लबाडीचा असून कायदेशीर नसल्याचे व प्रतिवादीने अर्जात नमुद केलेल्या कारणांच्या अनुषंगाने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केले नसल्याचे तसेच प्रतिवादी यांना समन्सची बजावणी ही ०१ वर्ष ४ महिने १३ दिवसा आधी झालेली असून प्रतिवादी मुद्दाम जाणुनबूजून न्यायालयात हजर राहिले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली. तसेच अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीला रु. ५०००/- दंड आकारावी अशी विनंती वादींतर्फे करण्यात आली आहे.

५. वादी व प्रतिवादी क्र. ३ तर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

६.		दावा, अर्ज, म्हणणे व अभिलेख यांचे अवलोकन केले. प्रस्तूतचा दावा हा वादीने डिक्लरेशन व निरंतरची ताकिदीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र. ३ यांना दि. २१/०९/२०२१ रोजी दाव्याचे समन्स बजावल्याचे व ते दि. २२/०९/२०२१ रोजी दाव्यात हजर झाल्याचे दिसून येते. त्यानंतर प्रतिवादी क्र. ३ तर्फे दि. २२/०९/२०२१ रोजी (नि.क्र. १२), दि. ३०/०९/२०२१ रोजी (नि.क्र. १४) व दि. २३/१०/२०२१ रोजी (नि.क्र. १५) वर कैफियत देण्याकरिता मुदतीचा अर्ज दिला होता. तरी परंतु दाव्याचा गुणावगुणावर निकाल होण्यासाठी प्रस्तुत प्रतिवादीचे म्हणणे व कैफियत अभिलेखावर असणे आवश्यक आहे. अर्जातील मजकुराबाबत प्रतिज्ञापत्र नि.क्र. २५ दाखल केला आहे. त्यामुळे या प्रतिवादीला त्याचा बचाव दाव्याच्या गुणदोषावर निकाल होण्यासाठी दाखल करण्याची परवानगी देणे उचित आहे. अर्ज मंजुर केल्यास वादीचे नुकसान होणार नाही. मात्र नामंजुर केल्यास प्रस्तुत प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३ यांना म्हणणे व कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब या प्रतिवादीने वादीला रक्कम रुपये २००/– मात्र कॉस्ट देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

३. कॉस्टची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादी क्र. ३ यांचे म्हणणे व कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

(एम.आर. कामत)

दिनांक ०३.०३.२०२३.		३रे सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Court | : | 3$^{rd}$ Jt. C. J. J. D. & J. M. F. C. Pandharpur |
| Order typed by | : | A. B. Sandrok (Stenographer Grade-III) |
| Order uploaded by | : | S.M.Shaikh (Stenographer Grade-III) |
| Date | : | 03/03/2023. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 03/03/2023. |
| Judgment/Order uploaded on | : | 09/03/2023. |